अधीक्षक अभियंता (स्थापत्य) या संवर्गातील अधिकाऱ्याची सुधारित पदस्थापना करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन आदेश क्रमांकः एलटीएस-१२१८/(२१/२०१८)/आ (वर्ग-१)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ०६ मार्च, २०१८.

<u>वाचा:-</u>जलसंपदा विभाग, शासन आदेश क्र.एलटीएस-१२१७/(३०६/२०१७), आ.(वर्ग-१), दि.३०.१२.२०१७.

शासन आदेश :-

सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने संदर्भीय आदेशान्वये श्री.सुनिल दौलतराव साळुंके, अधीक्षक अभियंता, यांची संदर्भांकित दि.३०.१२.२०१७ च्या शासन आदेशान्वये प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, पुणे या पदावर बदलीने नियुक्ती करण्यात आली होती.

२. आता, प्रशासकीय कारणास्तव व सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने श्री.साळुंके यांची सुधारित पदस्थापना बदली अधिनियमातील कलम ४(५) नुसार अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, पुणे या रिक्त पदावर करण्यात येत आहे.

३. संबंधीत अधिकारी नवीन नियुक्तीच्या जागी कोणत्या दिनांकास हजर झाले याबाबत शासनास **doesttclass1.wrd@maharashtra.gov.in** या ई-मेल संकेतस्थळावर त्वरित कळवावे.

४. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ नियुक्तीच्या ठिकाणी हजर न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लंघन करणारी असल्यामुळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०६१७३२२२२९२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2018.03.06 17:34:07 +05'30'

(सु.गं. गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) प्रधान सचिव (जलसंपदा)/ सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि) / सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) प्रधान सचिव, मृद व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) सर्व कार्यकारी संचालक / महासंचालक, जलसंपदा विभाग.
४) सर्व मुख्य अभियंता व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई.
५) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
६) महालेखापाल, महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता), १-मुंबई / २-नागपूर.
७) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
८) खाजगीसचिव, मा. मंत्री(जलसंपदा), मंत्रालय, मुंबई.
९) खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री(जलसंपदा),मंत्रालय, मुंबई.
१०) संबंधीत अधिकारी.
११) संबंधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
१२) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई .
१३) कार्यासन आ (वर्ग-१), संग्रहार्थ.